# देशदूत

शिल्पकार विकासाचा...

श्रावण मास

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | धुळे | वर्ष २७ । अंक २९९ । सोमवार, दि. १२ ऑगस्ट २०२४ । पाने ८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर


## संपादकीय

### पॅरिस ऑलिंपिकचा धडा

पॅरिस ऑलिंपिकचा आज समारोप होत आहे. यंदाच्या ऑलिम्पिकने भारतीयांनी अनेक धडे घेण्याची गरज अधोरेखित केली. देशाने किती पदके मिळवली, खेळाडूंचे कर्तृत्व याचे कवित्व काही काळ रंगत राहील. रंगायलाही हवेच. कारण त्यांचा पराक्रम हा तमाम भारतीयांच्या अभिमानाचा विषय आहे. जे खेळाडू मायदेशी परत आले त्यांचे स्वागत म्हणूनच जोरदार झाले. काही खेळाडूंचे प्रदर्शन वादाच्या भोवऱ्यात सापडले. त्याची दखल कशी घ्यायची किंवा नाही हा त्या-त्या खेळाच्या संघटना आणि क्रीडा मंत्रालयाच्या अखत्यारीतील विषय आहे. तथापि समाज म्हणून अजूनही वैचारिक परिपक्वता दाखवण्यात कमी पडतात का? यावर विचार व्हायला हवा का? केवळ समाज माध्यमाचे व्यासपीठ उपलब्ध आहे म्हणून मन मानेल त्या भाषेत लोकांनी बोलावे का? पदकविजेता खेळाडू घडणे ही दीर्घकालीन आणि विलक्षण गुंतागुंतीची प्रक्रिया असते हे सारेच मान्य करतील. त्या प्रक्रियेत खेळाडू आणि त्याच्या प्रशिक्षकांच्या शारीरिक आणि मुख्यत्वे मानसिकतेचा कस अनेक वेळा लागतो. यंदाच्या ऑलिंपिकमध्ये पदक मिळवलेल्या आणि पदक न मिळवलेल्या अनेक खेळाडूंच्या ज्या कहाण्या प्रसिद्ध झाल्या; त्या हेच दर्शवतात. अत्युच्च स्पर्धेत पदक मिळवणे तिथे जाणाऱ्या प्रत्येक खेळाडूंचे स्वप्न असते. त्यासाठी तो अनेक आव्हाने पेलतो. जीवतोड मेहनत घेतो. पदक मिळणे-न मिळणे याला अनेक गोष्टी कारणीभूत ठरतात. खेळाडूंच्या प्रदर्शनाविषयी मते व्यक्त करताना त्याचा आदर आणि भान राखण्याची अपेक्षा गैर मानली जाईल का? लोकांनी मिळून समाज बनतो आणि खेळाडू त्याचाच एक भाग आहेत याचा विसर पडून कसे चालेल? त्या अर्थाने अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार जसा आम जनतेला मिळतो तसा खेळाडूंनाही मिळतोच. खेळाडू घडण्याच्या पद्धतीचा समाज एक महत्त्वाचा घटक असतो. सामाजिक प्रेरणा खेळाडूला लक्ष्यप्राप्तीसाठी प्रेरकच ठरते. याच खेळाडूंकडून युवा प्रेरणा घेतात. पान २ वर

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 2000 |
| नवती (२) | : 1900 |
| पिलबाग | : --- |
| वापसी | : --- |

### मिश्किली




# मराठा आंदोलक आक्रमक

## बार्शीत शरद पवारांना दाखविले काळे झेंडे



**सोलापूर ।** मराठा आरक्षणप्रश्नी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पाठोपाठ आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनाही मराठा आंदोलकांच्या विरोधाला सामोरे जावे लागत आहे. सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेल्या पवारांना अगोदर कुर्डूवाडीजवळ या आंदोलकांनी अडवले. या वेळी त्यांना मराठा आरक्षणप्रश्नी भूमिका स्पष्ट करण्याची मागणी त्यांनी केली. यानंतर बार्शीत शेतकरी संवाद मेळाव्यातही पवार हे भाषण करीत असताना या प्रश्नावर आंदोलकांकडून पवारांना काळे झेंडे दाखवत घोषणाबाजी करण्यात आली.

पवार हे रविवारी बार्शी येथे आयोजित शेतकरी संवाद मेळाव्यासाठी जात असताना कुर्डूवाडीजवळ अंबड (ता. माढा) येथे मराठा आंदोलकांनी त्यांना अडवले. या वेळी त्यांनी पवारांकडे मराठा आरक्षणाबद्दल विचारणा केली. यावेळी पवार यांनी मराठा आरक्षणाला आपला पूर्वीपासूनच पाठिंबा असल्याचे सांगितले मात्र त्यावर आंदोलकांचे समाधान झाले नाही. तुम्ही खूप दिवसांपासून मराठा आरक्षणाला पाठिंबा असल्याचे सांगता. मात्र जाहीरपणे भूमिका स्पष्ट पान २ वर

### तुम्ही किती काळ फसवणार-विखे पाटील

मराठा आंदोलकांनी शरद पवारांची गाडी अडवली. याबाबत राधाकृष्ण विखे पाटील यांना विचारले असता ते म्हणाले की, शरद पवार चार वेळेला मुख्यमंत्री राहिले आहेत. मात्र ते आरक्षणाबद्दल का बोलत नाहीत. शरद पवारांची भूमिका दुटप्पी आहे. लोकांना तुम्ही किती काळ फसवणार आहात? आरक्षणाबाबत शरद पवारांनी भूमिका स्पष्ट केलीच पाहिजे. पवारांकडून सरकारला बदनाम करण्याचे षडयंत्र सुरु आहे, असे राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटले.

### माज उतरवायचे औषध मराठ्यांजवळ-जरांगे

**कात्रज ।** प्रचंड गर्दीत



मनोज जरांगे पाटील यांच्या शांतता रॅलीचे कात्रज चौकात जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी बोलताना जरांगे पाटील म्हणाले, मराठे एक नाहीत असे ज्यांनी हीणवले त्यांना पुणेकरांनी दाखवून दिले. मुंबईतल्या बऱ्याच जणांना माज आला आलाय तो माज उतरवयाचे औषध मराठ्यांजवळ असल्याचा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे.

## नांदेड येथे पटोलेंसमोर 'एक मराठा, लाख मराठा'



**नांदेड ।** काँग्रेसची नांदेडमध्ये आज विभागीय आढावा बैठक आयोजित करण्यात आली. ही बैठक सुरू असताना अचानक मराठा आंदोलक या बैठकीत घुसले. पोलिसांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांना न जुमानता सर्व आंदोलन सभागृहात घुसले. यावेळी व्यासपीठावर काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, सभागृहनेते बाळासाहेब थोरात यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. मराठा आंदोलकांनी सभागृहात घुसताच घोषणाबाजी सुरू केली. एक मराठा, लाख मराठा अशा घोषणा मराठा आंदोलकांनी दिल्या. अचानकपणे मराठा आंदोलन घुसल्याने काही काळ गोंधळ उडाला.

मराठा आंदोलकांनी नाना पटोले, रमेश चेन्नीथला, बाळासाहेब थोरात यांना आंदोलकांनी मराठा आरक्षणासंदर्भात जाब विचारला. मराठा आरक्षणासंदर्भात काँग्रेस पक्षाची केंद्राची आणि राज्याची भूमिका काय हे जाहीर करा, अशी मागणी आंदोलकांनी केली. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी आहे. त्या मागणीला तुमचं समर्थन आहे किंवा नाही हे सांगा. गूळमुळीत भूमिका घेऊ नका, असं मराठा आंदोलक काँग्रेस नेत्यांना म्हणाले. लोकसभेत मराठा समाजाने साथ दिली आणि आघाडीचा विजय झाला. पण आपल्या पक्षाची भूमिका स्पष्ट नाही. याचा अर्थ तुम्ही फक्त मराठा समाजाचा वापर केला का? असा जाब मराठा आंदोलकांनी विचारला. आता काँग्रेस पक्षाची भूमिका स्पष्ट करा, अशी मागणी मराठा आंदोलकांनी केली. यावेळी काँग्रेस नेत्यांनी मराठा आंदोलकाचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच त्यांच्याकडून निवेदन स्वीकारले. यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आ.नाना पटोले यांनी मराठा आंदोलकांशी चर्चा करुन त्यांना आरक्षणाबाबत तोडगा काढण्यासाठी विरोधी पक्ष म्हणून जे-जे आवश्यक आहेत. ते-ते सर्व प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिले.

## उपमुख्यमंत्री ना.अजित पवार आज अमळनेरात

### युवा संवाद व शेतकरी सन्मान संवादाचे आयोजन

**अमळनेर ।** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जनसंवाद यात्रेनिमित्त राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित पवार आज दि.१२ रोजी अमळनेरात येत असून त्यांच्या उपस्थितीत प्रताप महाविद्यालयात युवा संवाद व कलागुरु मंगल कार्यालयात शेतकरी सन्मान संवादाचे आयोजन करण्यात आले आहे.विशेष म्हणजे पालिकेच्या सफाई कामगारांसोबत भोजन देखील ते घेणार आहेत.

अजित पवार यांच्या सोबत राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष खा.सुनिल तटकरे व महिला प्रदेशाध्यक्षा तथा महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ रुपालीताई चाकणकार या देखील उपस्थिती देणार आहेत.मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी या यात्रेची जय्यत तयारी केली असून अजित पवारांच्या स्वागताचे फलक संपुर्ण शहर तालुक्यात झळकले आहेत.या जनसन्मान यात्रेचे दुपारी १ वाजता धुळ्याकडून अमळनेरात आगमन होणार असून कलागुरु मंगल कार्यालया जवळील प्रवेशद्वारापासून भव्य बाईक रॅलीने त्यांचे शहरात स्वागत केले जाणार आहे.दुपारी १.३० वाजता माजी आमदार कृषिभूषण साहेबराव पाटील यांच्या राज भवन येथील निवासस्थानी स्वागत व राखीव त्यांतर २ वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात पान २ वर

## खा.सुप्रिया सुळे यांचा मोबाईल हॅक



**मुंबई ।** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांचा मोबाईल हॅक झाला आहे. सुप्रिया सुळे यांनी स्वत: सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर याबाबतची माहिती दिली. त्यांचा मोबाईल आणि व्हॉट्सॲप हॅक झालं आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.रविवारी दुपारी १ वाजताच्या सुमारास सुप्रिया सुळे यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केला. यामध्ये त्यांनी कार्यकर्ते आणि जनतेसाठी एक संदेश दिला. अत्यंत महत्त्वाचे असं म्हणत सुप्रिया सुळे यांनी त्यांच्या मोबाईल आणि फोन हॅक झाला असल्याचे सांगितले. तसेच, कोणी त्यांना फोन किंवा मेसेज करु नये असंही त्या म्हणाल्या.

## अदानी अन् सेबीत हितसंबंध

### हिंडेनबर्गचा रिसर्च संस्थेचा नवा गौप्यस्फोट



**नवी दिल्ली ।** उद्योगपती गौतम अदानी आणि शेअर बाजार नियामकच्या प्रमुख माधवी पुरी-बूच यांच्यावर हिंडेनबर्गने केलेल्या नव्या आरोपांवरुन राजकारण तापले आहे. यामुळे सत्ताधारी आणि विरोधक पुन्हा एकदा आमनेसामने आले आहेत. दरम्यान, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीही केंद्र सरकारवर निशाणा साधला असून, या प्रकरणाची संयुक्त संसदीय समिती मार्फत चौकशीची मागणी केली आहे.

हिंडेनबर्गच्या नवीन रिपोर्टमध्ये गौतम अदानी आणि माधवी पुरी-बूच यांच्यात आर्थिक हितसंबंध असल्याचा आरोप करण्यात आला आहे. आता यावरुन मल्लिकार्जुन खरगे म्हणतात की, हिंडेनबर्गने जानेवारी २०२३ मध्ये केलेल्या खुलाशांनंतर सेबीने मोदीजींचे जिवलग मित्र गौतम अदानी यांना सर्वोच्च न्यायालयासमोर क्लीन चिट दिली होती. आता त्याच सेबी प्रमुखाचे अदानींसोबत आर्थिक संबंध उघड झाले आहेत. पान २ वर

## ना.देवेंद्र फडणवीस यांच्या अकोला दौऱ्यात सुरक्षेत चूक



**अकोला ।** अकोल्यात राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ताफ्यात सुरक्षा यंत्रणेची चूक समोर आलीय. देवेंद्र फडणवीस यांचा ताफा मुख्य राष्ट्रीय महामार्गावर लागला तरी फडणवीसांच्या सुरक्षा यंत्रनेतील पोलिसांचा ताफा हा कृषी विद्यापीठातच होता. त्यामुळे सुरक्षा यंत्रणेची ही मोठी चूक समोर आली आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातल्या विश्रामगृहात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जाणार असं सुरक्षा यंत्रणेला वाटलं होतं. मात्र फडणवीस यांचं वाहन थेट मुख्य महामार्गावर लागल्याने त्यांच्या ताफ्यातील मागील सुरक्षा यंत्रणेचा ताफा हा मागेच राहिला. यात पोलिसांचे वाहन आणि ॲम्बुलन्स इतर वाहने मागेच पान २ वर

## ओबीसींच्या अंगावर येणाऱ्यांना सोडू नका!

### सांगलीच्या मेळाव्यात भुजबळांचे आवाहन

**सांगली ।** मनोज जरांगे यांनी सगेसोयऱ्यांची



मागणी मान्य होणं शक्य नाही, सगळ्यांनाच कुणबी व्हायचं आहे मग राज्यात मराठा शिल्लक राहील का असा सवाल राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे यांना विचारला. सगळेच मराठे वाईट नाहीत, पण ओबीसींच्या अंगावर येणाऱ्यांना सोडू नका असे आवाहन छगन भुजबळांनी केले आहे.

सांगलीत ओबीसी आरक्षण बचाव मेळाव्यात ते बोलत होते. ज्येष्ठ ओबीसी नेते छगन भुजबळांनी मनोज जरांगेंना पुन्हा थेट आव्हान दिले. राज्यात २८८ जागांवर उमेदवार उभे करू असं ते म्हणतात, अरे ८८ जागा लढवून दाखव आणि त्यातले ८ निवडून आणून दाखव असे आव्हान भुजबळांनी मनोज जरांगे यांना दिले. मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देणे शक्य नाही, सगेसोयऱ्यांना देखील आरक्षण देता येणार नाही हे जरांगेंनी समजून घ्यावे असे देखील ते म्हणाले.

सांगलीचे वसंतदादा कुठे आणि आता त्याचे वारसदार कुठे असे म्हणत भुजबळांनी खासदार विशाल पाटील यांच्यावर टीका केली. तसेच मनोज जरांगे म्हणजे नवीन नेता असा उल्लेखही त्यांनी केला. आरक्षण हे आर्थिक स्थितीवर नसून सामाजिक मागासलेपणावर आहे, हे त्याला कसे समजणार असे म्हणत भुजबळांनी मनोज जरांगे यांच्यावर टीका केली. सगळे मराठे वाईट नाहीत, पण जो ओबीसीच्या पान २ वर

## राज्यातील १७ लाख कर्मचारी बेमुदत संपावर जाणार

**मुंबई ।** महाराष्ट्रातील तब्बल १७ लाख राज्य सरकारी कर्मचारी बेमुदत संपावर जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. राज्य सरकारी कर्मचारी संघटना कृती समितीची आज मुंबईत बैठक पार पडली. या बैठकीत राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. येत्या २९ ऑगस्टपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. राज्य सरकारी कर्मचारी संघटना कृती समितीचे मुख्य निमंत्रक विश्वास काटकर यांनी याबाबत माहिती दिली. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी जुन्या पेन्शन प्रमाणे नवीन पेन्शन देण्याच्या मुद्द्यावर संप पुकारला आहे. कृती समितीचे प्रमुख विश्वास काटकर यांनी स्वत: याबाबत माहिती दिली आहे. राज्य सरकारने तात्काळ नोटिफिकेशन काढण्याची मागणी कर्मचारी संघटनेकडून करण्यात आली आहे. तसेच नोटिफिकेशन निघत नाही तोपर्यंत संप सुरु ठेवण्याचा निर्धार संबंधित कर्मचारी संघटनेने केला आहे.

# ॲक्शनला रिॲक्शन मिळणारच!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेकडून मनसैनिकांची पाठराखण

**मुंबई ।** उद्धव ठाकरे यांच्या ताफ्यावर झालेल्या हल्ल्यानंतर आता राज्यातील राजकारण पुन्हा एकदा तापू लागलं आहे. या घटनेनंतर विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या असून यासंदर्भात आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही भाष्य आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी विविध विषयांवर त्याची भूमिका स्पष्ट केली. यादरम्यान, त्यांना उद्धव ठाकरे यांच्या गाडीवर मनसेच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या हल्ल्याबाबतही विचारण्यात आले यासंदर्भात बोलताना, ॲक्शनला रिॲक्शन असते, ती ठाण्यात बघायला मिळाली, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, या




सगळ्याची सुरुवात राज ठाकरेंच्या मराठवाडा दौऱ्यात झाली. बीडमध्ये असताना ठाकरे गटाच्या नेत्यांनी ही सुरुवात केली. ठाकरे गटाच्या नेत्यांनी राज ठाकरेंच्या ताफ्यावर सुपाऱ्या फेकल्या. ते कुणालाही आवडलेले नाही. ही महाराष्ट्राची संस्कृती आणि परंपराही नाही. शेवटी ॲक्शनला रिॲक्शन असते, ती ठाण्यात बघायला मिळाली, पण अशा घटनेचं समर्थन होऊ शकत नाही, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

### म्हणून ठाकरे गटावर ही वेळ आली

ज्यावेळी आम्ही सरकार स्थापन केलं, तेव्हा आम्हालाही हे सरकार दोन महिन्यात कोसळेल, असं म्हणत होते. मात्र, आज दोन वर्ष झाले, आमचे सरकार टीकून आहे. कारण आम्ही बाळासाहेब आणि आनंद दिघे यांच्या विचारावर चालतो आहे. ज्यांनी बाळासाहेब आणि आनंद दिघे यांचे विचार सोडले त्यांच्यावर आता अशा परिस्थितीचा सामना करण्याची वेळ आली आहे, अशी प्रतिक्रियाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

## बांगलादेशातील अराजकतेमागे अमेरिका

**नवी दिल्ली ।** शेख हसीना यांनी



बांगलादेशच्या पंतप्रधान-पदाचा राजीनामा देऊन देशातून पलायन केले आहे. त्या सध्या भारतात असून त्यांनी बांगलादेशातील अराजकतेला अमेरिका जबाबदार असल्याचा आरोप केला आहे. अमेरिकेनेच त्यांना सत्तेवरून पायउतार होण्यास भाग पाडल्याचं वक्तव्य केलं आहे. शेख हसीना यांनी अमेरिकेला सेंट मार्टिन बेट न दिल्यामुळे अमेरिकेने त्यांना सत्तेवरून हटवण्याची योजना आखली होती, असेही हसीना यांनी म्हटले आहे.